महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :–जि.वा.शा./अनपेड चालान,प्रेसनोट/ ४१८/२०२४
कार्यालय – जिल्हा वाहतुक शाखा, अमरावती ग्रामीण
दिनांक :– १२/०८/२०२४

# प्रेसनोट

वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे व वाहने भरधाव वेगाने चालविल्यामुळे रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्याचे दृष्टीने वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनांवर अमरावती ग्रामीण वाहतुक पोलीसांमार्फत मो.वा.का. अंतर्गत ई–चालान स्वरुपात दंडात्मक कारवाई करण्यात येते. परंतु बरेच वाहन चालक–मालक यांनी त्यांचेवर करण्यात आलेल्या कारवाईची दंडाची रक्कमेचा भरणा अदयापपावेतो केलेला नाही.

सर्व वाहन चालक–मालक यांना मा.पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांचे तर्फे आवाहन करण्यात येते की,आपले मोबाईलवर आलेल्या मॅसेजनुसार मो.वा.का.केसेसचे प्रलंबीत (अनपेड ई–चालान) दंडाची रक्कम नजिकचे पोलीस स्टेशन, जिल्हा वाहतुक शाखा, अमरावती ग्रामीण येथे किंवा कर्तव्यावर असलेल्या वाहतुक पोलीसांकडे भरणा करुन पोलीसांना सहकार्य करावे. अन्यथा कसुरदार वाहन चालक–मालक यांचे विरुध्द संबंधीत न्यायालयामार्फत मोटर वाहन कायदयाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

विशाल आनंद (भा.पो.से.)
पोलीस अधिक्षक,अमरावती ग्रामीण

Scanned by CamScanner